**Reviews of Literature**
**Volume 1 , Issue 1 / Aug 2013** **ISSN:-**

# *यशवंतराव चव्हाण आणि 1942 चा लढा*

***सुरेश मारूती चव्हाण***
इतिहास विभाग प्रमुख कला वणिज्य व विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज.

***सारांश :***

व्यापारी म्हणून भारतात आलेल्या इंग्रजांनी तराजूचा त्याग करून तलवारीच्या बळावर राजकीय सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. आणि थोडयाच अवधीत अनेक चांगल्या – वाईट मार्गांचा वापर करून बहुतांशी भारत आपल्या सत्तेखाली आणला. प्रशासकिय सुधारणांच्या नावाखाली अन्याय व अत्याचाराचा इतिहास घडू लागला. जोपर्यंत बिटिशांचा अन्याय सहन कारण्याची सहनशिलता होती. तोपर्यंत भारतीयांनी तो सहन केला. पण जेंव्हा ,भारतीयांच्या सहनशिलतेचा बांध फुटला गेला तेंव्हा त्यांनी प्रतिकारला सुरूवात केली. आणि इथंच भारतीय स्वातंत्र लढयाचा जन्म झाला.

***प्रस्तवाना :***

या स्वातंत्र चळवळीने अनेक टप्प्यातून वाटचाल करत करत भारताला स्वातंत्र मिळवून देण्याचा प्रयत्न केला. या वाटचालीत 1942 चा लढा अत्यंत महत्वाचा होता. कारण एक म्हणजे या लढयामुळेच भारतीय स्वातंत्र दृष्टीक्षेपात आले हाते. आणि दुसरे म्हणजे महाराष्ट्राचे शिल्पकार आणि थोर सपुत्र यशवंतरावजी चव्हाण यांच्या राजकारण, मुत्सदधेगीरी आणि क्रांतीकार्याचा स्पर्श झाला होता. म्हणजेच भारतीय स्वातंत्र चळवळीत यशवंतरावांचे योगदान मोठे होतेच पण त्याचबरोबर 1942 च्या लढयातील त्यांचे योगदानही अनन्य साधारण महत्वाचे होते. महात्मा गांधीनी दिलेल्या 'करा किंवा मरा' या संदेशाने भारावून जावून कराड परिसरातील अनेक सहकारी मित्रांच्या सहकार्याने सभा, मोर्चे, बहिशकार यासारख्या मार्गांनी त्यांनी ब्रिटिश सत्तेला आव्हान देण्याचा महान प्रयत्न केला. सुदैवाने लग्न झालेले असतानाही संसार सागराचा त्याग करून त्यांनी प्रत्यक्ष चळवळीत सहभाग घेतला. पुढे अनेक चढउतार आले, वैयक्तिक दुःखा बरोबरच कौटुंबिक दुःखांची संकटेही कोसळली. तरीही त्यांनी क्रांतीकार्यापासून फारकत घेवून स्वातंत्रनिश्ठेला तडा जाऊ दिला नाही. म्हणजेच आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर महाराश्ट्राच्या मुख्यमंत्री पदापासून ते देशाच्या उपपंतप्रधान पदापर्यंत मजल मारणऱ्या यशवंतरावांचे 1942 च्या चळवळीतील योगदानही अनन्यसाधारण महत्वाचे होते. म्हणूनच प्रस्तुत शोधनिंबधात 1942 च्या लढयातील यशवंतरावांच्या भूमिकेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

***यशवंतरावांची जडणघडण :–***

सांगली जिल्हायातील देवराष्टे नावाच्या लहान खेडेगावात 12 मार्च 1913 रोजी त्यांचा जन्म झाला. 1917 च्या प्लेगच्या साथीत वडिलांच्या मृत्यूने वयाच्या चौथ्या वर्शीच ते वडिलांच्या प्रेमाला पोरके झाले. पण ''नका बाळांनो डगमगू ! चंद्र सूर्यावरील जाईल ढगू '' अस म्हणून जगण्याची हिंम्मत वाढविणाऱ्या आई विठाबाई यांनी त्यांच्यावर महान संस्कार केले. एका बाजूला यशवंतरावांचे शिक्षण चालू होते तर दुसऱ्या बाजूला स्वातंत्र्याची चळवळ गतीमान झाली होती. टिळक युगाची समाप्ती होऊन गांधी युगाला सुरूवात झाली होती. याचा बाल यशवंतरावांच्या मनावर आंदोलनातील या घडामोडींचा प्रभाव पडत होता. असहकार चळवळीत भाग घेतलेल्या क्रांतीकारक यतींद्रदासांना लाहोरच्या कटात ओऊन तुरंगात डांबण्यात आले. अतोनात छळ होवू लागल्याने त्यांनी उपोशण केले. दासांची प्रकृती खंगत जावून ते मृत्युच्या समिप गेले. आणि एके दिवशी त्यांनी लाहोरच्या तुरूंगात भर दुपारी प्रखर सूर्याला साक्षी ठेऊन प्राणांची आहुती दिली. काही काळानंतर भारतमातेच्या स्वातंत्र्याची शपथ घेणाऱ्या भगतसिंग – सुखदेव – राजगुरूना फाशी देण्यात आले. त्यामुळे यशवंतराव पुरते हादरून गेले. त्यांच्या अंतःकरणाला खोल जखमा झाल्या. ते ओक्साबोक्सी रडू लागले. अर्थात या घटनांचा त्यांच्या मनावर खोल परिणाम होवूनच त्यांच्यातील क्रांतीकारकाचा जन्म झाला. 1930 ते 1945 असे दिड दशक शिक्षण आणि स्वातंत्र आंदोलन अशा दोन्ही आघाडयावर ते लढत राहिले.

***1942 च्या लढयातील यशवंतरावांचा सहभाग –:***

1942 च्या प्रत्यक्ष लढयाच्या पूर्वसंध्येला यशंवतराव सातारा जिल्हयातील कॉंग्रेसचे लहानसे कार्यकर्ते होते. आखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची बैठक 8 ऑगस्टला घेण्याचे निश्चिीत झाले होते. वातावरण चांगलेच तापले होते. दरम्यान यशवंतरावासह जिल्हयातील कार्यकर्ते मुंबईला रवाना झाले हाते. प्रत्यक्ष बैठकित अनेक भाषणे ऐकून सर्वजन भारावून गेले होते. गांधीजीनी दिलेल्या चलेजाव च्या घोशणेला अनुसरून या स्वातंत्र्ययुद्धात हिरिरीने उडी घ्यायची असे यशवंतरावांनी ठरविले. इंग्रजांची धरपकड सुरू असतानाच गुप्तपने सातारा जिल्हायात पोहचायचे अन् उठाव करायचा असे डाव आखत–आखत ते साताऱ्याच्या रोखाने निघाले. जिल्हयात पोहचलेल्या यशवंतरावसमोर दोन पर्याय उभे होते. एक म्हणजे ब्रिटिश सत्ता खिळखिळी करण्यासाठी त्या सत्तेला आधार देणाऱ्या गोश्टीचा विध्वंस करणे. किंवा स्वातंत्रलढयाचा संदेश जनतेपर्यंत पाहेचवून तिला लढण्यासाठी संघटित करणे. त्यांच्या दृश्टीने दुसरा पर्याय महत्वाचा असल्याने तोच त्यांनी स्विकारला. ते आपल्या सहाकार्यांना सांगू लागले की, ''ही चळवळ तुरूंगभरतीची नाही. तर जिंकू किंवा मरू या इर्शेने लढण्याची आहे. या लढयात सर्वस्वाची तर होळी होईलच पण या क्रांतीच्या होमकुंडात प्रसंगी स्वतःचीही आहुती द्यावी लागेल. अविचाराने कोणतेही पाऊल टाकू नका. तुमचे शिक्षण ,आईबाप, या सर्वांचा त्याग करावा लागणार आहे . आपल्या भावी सुखस्वप्नांची होळी करावी लागेल. यावर ठाम आसल तरच तुम्हाला हे क्रांतीकार्य करता येईल. आपल्या होणाऱ्या सर्व नुकसानीची जबाबदारी आपण स्वःता स्वीकारण्यास तयार असले पाहिजे. एवढी ज्यांची तयारी असेल त्यांनाच मी पुढे काय करायचे ते सांगेन.'' यशवंतरावांच्या या प्रभावी विचाराने भारावलेल्या पाच –पन्नास विद्यार्थ्यांनी आपपल्या शाळांचा त्याग करून चळवळीत सामिल होण्याचा निर्णय घेतला. आणि यातूनच विलक्षण अशा बेचाळीसच्या लढयाला सुरूवात झाली.

या चळवळीचा एक भाग म्हणून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मोठमोठे मोर्चे न्यायचे ,प्रत्येक कचेरीवर कॉंग्रेसचा झेंडा लावायचा, आधिकाऱ्यावर दहशत बसविणे. या सारखे कार्यक्रम सुरू झाले. त्यामुळे स्वातंत्र्याची एक लाटच सर्व तालुक्यात निर्माण झाली.सर्वसामान्यांना

चेतना मिळाली. त्यातूनच कराड, वडूज, पाटण, तासगांव, येथील मोर्चे यंशवंतरावंनी संघटीत व यशस्वी केले. वडूजच्या मोर्चावर झालेल्या गोळीबारात 9 माणसे दगावली त्यात हुतात्मा परशुराम पैलवान स्वातंत्र्याच्या आठवणी ठेवून गेला. तर इस्लामपूरच्या गोळीबारात किर्लोस्करवाडीला इंजिनियर असलेला पंडया नावाचा तरूण बळी पडला. अशी कितीतरी उदाहरणे यशवंतरावाच्या नेतृत्वाखालील क्रांतीकार्याची साक्ष देतात. या कठिण काळात आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, अच्युतराव पटवर्धन, लक्ष्मणराव धनवंतरी , पांडू मास्तर, के.डी.पाटील ,भिकुजी साळुंखे ,किसनवीर ,सदाशिव पेंडारकर ,महादेवराव जाधव ,बाबुराव कोतवाल यांच्यासारखी मंडळी संवगडी म्हणून कार्यरत होती .दरम्यान सरकारने त्यांच्या क्रांतीकार्याचा धसका घेऊन यशवंतरावांना पकडण्यासाठी 1000 रूप्यांचे बक्षिस जाहिर केले. यशवंतराव चव्हाण हे सातारा जिल्हयातील भूमिगत आंदोलकांचे मार्गदर्शक होते. कारण या आदोलनात भूमिगत कार्य जेंव्हा सुरू झाले तेंव्हा सातारा जिल्हा भूमिगत चळवळीचे नेतेपद यशवंतरावांना एकमताने देण्यात आले होते.

सरकारच्या हातावर तुरी देवून क्रांतीकार्य करत आसतानच 1943 ला यशवंतरावांना आपली पत्नी आजारी पडल्याची बातमी लागली. ते विलक्षण अस्वस्थ झाले. दगाफटक्याची शक्यता असतानाही त्यांनी पत्नीला भेटण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी वेणुताई फलटणला होत्या . तेथील पोलिसप्रमुख सासऱ्यांचा स्नेही होता. पुण्याहून 10 वाजेपर्यंत फलटणला पोहचावे व वेणूताईस भेटून पहाटे 4 ला परत यावे अशी योजना आखण्यात आली. पण दुर्दैवाने प्रवासात गाडी पंक्चर झाल्याने ते पहाटे 4 ला फलटणला पोहचले. पत्नीची भेट घेतली पण भर दुपारीच वाडयाला पोलिसांचा गराडा पडला. स्वतः पोलीस प्रमुख दोन्ही हातात दोन पिस्तुले घेऊन पुढे आले आणि यशवंतरावांना त्यांनी अटक केली. या घटनेने त्यांच्या आयुष्यातील 1942 च्या लढयाचे पर्व संपुष्टात आले.

**समारोप :—**

1942 ला वेणूताईशी विवाह होऊन त्यांचा स्वतःचा संसार सुरू झाला होता. पण देशाचा संसार करण्याची प्रचंड उर्मी असणाऱ्या यशवंतरावांनी वकिली व्यवसायत न रमता 1942 च्या चलेजाव आंदोलनात उडी घेतली आणि एक नवा इतिहास घडविला. त्यांच्या या कार्यावर प्रकाश टाकताना राम प्रधान म्हणतात'' यशवंतराव नावाचा क्रांतीकरक स्वातंत्र युद्धाच्या काळात सूर्यासारखा तळपून निघत होता. टिळक विद्यालयात मिळालेल्या शिक्षणामळे त्यांच्यावर जे संस्कार झाले त्या संस्कारातून लोकमान्य टिळकांचे काही गुण यशवंतरावांच्या मनात उतरलेले होते. कारण टिळकांप्रमाणेच यशवंतरावांच्या मनातही प्रखर ध्येयवाद , देशप्रेम, त्याग, आणि जिद्द यासारख्या महान भावना टासून भरल्या होत्या .'' यशवंतरावांच्या प्रत्यक्ष सहभागामुळे व क्रांतीकार्यामुळेच सातारा जिल्हायातील 1942 चं आदोलन हा एक प्रदिर्घ इतिहास ठरला यात तिळमात्र शंका नाही. कराडसारख्या पंधरा हजार लोकसंख्येच्या छोटया शहरातून मोठया संख्येने विद्यार्थी व जनता बेचाळीसच्या लढयात सामिल झाली. शेकडो विद्यार्थ्यानी शाळांचा त्याग करून लढयात उडया घेतल्या. या पाठीमागे यशवंतरावांचे क्रांतीकार्य खूपच महत्वाचे हाते. आपणास मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा उपयोग करून दारिद्रय व अज्ञान यापासून आपणाला मुक्त व्हायचे आहे. इतरही मूलभूत स्वातंत्र्ये प्राप्त करायची आहेत. मिळणाऱ्या स्वातंत्र्याचे खरे फळ म्हणजे एखाद्या व्यक्तींचा किंवा गटाचा लाभ नव्हे तर संबंध समाजाचे जास्तीत जास्त कल्याण होय. हा विचार त्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीच्या संदर्भात केला होता. ते स्वातंत्र्य चळवळीशी एवढे एकरूप झाले होते की, या काळात त्यांनी कैदखान्यांनाच उत्तम ज्ञान देणारी शाळा मानली होती. कारण ते एके ठिकाणी स्वतः कबूल करतात की ''जेल मधील माझे जीवन म्हणजे उभ्या आयुष्यातील एक अत्यंत उत्तम असा काळ होता.'' आज स्वातंत्र्याचे मोल नसणाऱ्या विज्ञानाच्या प्रगत युगातील 20 वर्शोंच्या मुलाला देशभक्ती म्हणजे काय?हे सांगता येणार नाही हे कटू वास्तव आहे. पण पारतंत्र्याच्या बेडीतून मातृभूमिची सुटका करण्यासाठी केलेल्या क्रांतीकार्यामुळे 20 वर्षोच्या यशवंतरावांना 20–22 महिन्याची कैद होते. हा सत्य इतिहास आहे. आणि तो इतिहासच यशवंतराव चव्हाणांचे 1942 च्या लढयातील महान योगदान स्पष्ट करून जातो.

**संदर्भ सूची :—**

1) 'कृष्णाकाठ ', यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र ,रोहन प्रकाशन ,2012
2) शाम फरांदे 'कृष्णातीर ', साईश्रदधा प्रकाशन पुणे, 2012.
3) प्राचार्य व्ही.एल.एरंडे 'यशवंतराव चव्हाण : एक चिंतन '', मुक्तरंग प्रकाशन लातूर , 2011.
4) बाबुराव काळे '' यशवंतराव चव्हाण '' ,नारायण दत्तात्रय रेगे( प्रकाशक) मुंबई
5) 'यशवंत –किर्तीवंत ' लोकराज्य मासिक, माहिती व जनसंपर्क महासंचनालय महाराष्ट्र शासन,मार्च 2012.
6) 'प्रबोधन प्रकाशन ज्योती ' मासिक इचलकरंजी , फेब्रवारी 2012
7) सोलापूर विद्यापीठ इतिहास परिषद अधिवेशन सांगोला ,निवडक शोधानिंबध पुस्तीका 2012.
8) डॉ. शिवाजीराव देशमुख 'शैलीकार यशवंतराव '' कौसल्य पब्लिकेशन ,सोलापूर .2009
9) रा.तु. पाटील '' यशवंतराव चव्हाण : एक कर्तबगार पण वादग्रस्त मुत्सद्दी '' राजे देसाई प्रकाशन कोल्हापूर, 1986.
10) वाडीकर. भू.द.'' यशवंतराव चव्हाण : एक ललित लेणे '' प्रतिभास प्रकाशन परभणी 2010.
11) डॉ. नागनाथ हेगे (संपादक) 'जनामनातील यशवंतराव '' पद्मगंधा प्रकाशन पुणे,2002